दै. सकाळ दि. 9.12.2021

# धननील लोंढे याची निवड

गडहिंग्लज, ता. ८ : येथील ओंकार कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयाचा खेळाडू धननील लोंढे (बी. कॉम भाग-१) याची भुवनेश्वर (ओडिसा) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ योगासन स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ योगासन संघात निवड झाली आहे.

या स्पर्धा २५ व २६ डिसेंबर रोजी होणार आहेत. सातारा येथील सावित्रीबाई फुले महाविद्यालयात झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय योगासन स्पर्धेत धननीलने पाचवा क्रमांक पटकावून यश मिळविले. खेळाडूला संस्थाध्यक्ष राजन पेडणेकर, प्र. प्राचार्य डॉ. सुरेश चव्हाण, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. महेंद्र जाधव, कनिष्ठ विभागप्रमुख कविता पोळ, प्रकाश कांबळे यांचे प्रोत्साहन तर, शारीरिक शिक्षण संचालक व योगशिक्षक सुरेश धुरे यांचे मार्गदर्शन लाभले.



धननील लोंढे